# ज्येष्ठसन्मान

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या ३० व्या अधिवेशनानिमित्त प्रकाशित




५-६ फेब्रुवारी २०११ - नेरूळ, नवी मुंबई

सत्यमेव जयते

# मुख्यमंत्री

महाराष्ट्र राज्य

दिनांक : २१ जानेवारी, २०११

## शुभेच्छा संदेश

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे (फेस्कॉम) ३० वे अधिवेशन येत्या ५ व ६ फेब्रुवारी रोजी नेरुळ, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आल्याचे समजून आनंद वाटला.

ही संघटना गेल्या तीन दशकांपासून महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागात ज्येष्ठ नागरिकांचे जीवन आनंद करण्यासाठी कार्यरत आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्य करीत असतानाच सामाजिक विधायक कार्य करण्यासाठी संघांना प्रोत्साहन देण्याचे महासंघाचे कार्य उल्लेखनीय आहे. पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व ओळखून २०१०-२०११ हे वर्ष पर्यावरण संरक्षण वर्ष म्हणून साजरे करण्याचा महासंघ उपक्रम स्तुत्य आहे.

फेस्कॉमच्या ३० व्या अधिवेशनास आणि पुढील वाटचालीस माझ्या हार्दिक शुभेच्छा!

(पृथ्वीराज चव्हाण)

सत्यमेव जयते

## अजित पवार

### उपमुख्यमंत्री

महाराष्ट्र शासन

दिनांक : १९ जानेवारी, २०११

### शुभेच्छा संदेश

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या (फेस्कॉम) अधिवेशनानिमित्त स्मरणिका प्रकाशित करण्यात येणार असल्याचे समजून आनंद झाला.

महासंघ गेली ३० वर्षे राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील ज्येष्ठांचे जीवन आनंददायी करण्यासाठी कार्यरत आहे. महासंघ सामाजिक कार्यातही अग्रेसर आहे. सन २०१०-२०११ हे वर्ष 'पर्यावरण संरक्षण वर्ष' म्हणून साजरा करण्याचा उपक्रम कौतुकास्पद आहे. भविष्यात महासंघाचे कार्य आणखी विस्तारेल, असा मला विश्वास आहे.

महासंघाच्या अधिवेशनास आणि स्मरणिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा !

(अजित पवार)

सत्यमेव जयते

## गृह मंत्री

महाराष्ट्र राज्य

दिनांक : ७ जानेवारी, २०११

### शुभेच्छा संदेश

फेस्कॉमचे ३० वे राज्यव्यापी अधिवेशन आयोजित केल्याचे समजल्यावर मला आनंद वाटला.

ज्येष्ठ नागरिकांची सेवा करणे गरजेचे आहे. आपल्या महासंघामुळे हे कार्य सुरु असल्याने विशेष आनंद वाटतो. महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचा लौकिक सर्वत्र आहे. या अधिवेशनामुळे ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल.

अधिवेशनानिमित्त प्रकाशित होणारी स्मरणिका सर्वांना मार्गदर्शक ठरेल, असा मला विश्वास वाटतो.

आपल्या अधिवेशनास आणि स्मरणिकेस माझ्या शुभेच्छा!

(आर. आर. पाटील)

मंत्री

महाराष्ट्र राज्य

मंत्री
सार्वजनिक बांधकाम व पर्यटन
(सार्वजनिक उपक्रम वगळून)

महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : ४ जानेवारी, २०११

## शुभेच्छा

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ येत्या फेब्रुवारी महिन्यात आपले राज्यव्यापी अधिवेशन नेरुळ येथे भरविणार असून त्यानिमित्त स्मरणिका काढणार असल्याचे समजून आनंद वाटला.

समाजातील ज्येष्ठ नागरिकांना एकत्र आणून त्यांच्या समस्या सोडविण्याचे तसेच त्यांचे जीवन आनंदी करण्याचे कार्य आपला महासंघ करीत आहे. याबरोबरच आपला महासंघ सामाजिक विधायक कार्याला प्रोत्साहन देत आहे. कन्यारत्नाला जन्म देणाऱ्या मातांचा गौरव, पर्यावरण संरक्षण, वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन यांसारखे उपक्रम देखील राबवीत आहे. यातून महासंघाची आणि त्याच्या सदस्यांची सामाजिक बांधिलकीच व्यक्त होते. महासंघाने आयोजिलेल्या अधिवेशनात ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या नवनवीन समस्या सोडविण्याच्या दृष्टीने विचार विनिमय होईल. तसेच, स्मरणिकेत महासंघाच्या कार्याचे प्रतिबिंब पाहावयास मिळेल, असा मला विश्वास आहे.

महासंघाच्या राज्यव्यापी अधिवेशनाच्या यशस्वितेसाठी तसेच स्मरणिकेस माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

(छगन भुजबळ)

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण
आणि राजशिष्टाचार

महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : ६ जानेवारी, २०११

## शुभेच्छा

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) दिनांक ५ व ६ फेब्रुवारी, २०११ रोजी ३० वे राज्यव्यापी अधिवेशन घेत असून त्यनिमित्ताने एक स्मरणिका प्रकाशित करणार असल्याचे वाचून आनंद वाटला.

आपला महासंघाने २०१० हे वर्ष महिला वर्ष म्हणून आपण साजरे केले. त्यात स्त्रीजन्माचे स्वागत आणि कन्यारत्नाला जन्म देणाऱ्या मातांचा गौरव हे महत्त्वाचे कार्यक्रम अंतर्भूत केले त्याचप्रमाणे २०१०-११ हे वर्ष आपण पर्यावरण संरक्षण वर्ष म्हणून साजरे करीत आहात त्या निमित्ताने या अंतर्गत पाणी अडवा, पाणी जिरवा, झाडे लावा, झाडे जगवा हे उपक्रम राबवले जात असून आपला ३० व्या राज्यव्यापी अधिवेशनिमित्त एक स्मरणिका प्रकाशित करण्याचा संघटनेचा मनोदय स्तुत्य आणि अभिनंदनीय आहे.

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या (फेस्कॉम) वतीने संपन्न होणाऱ्या **राज्यव्यापी अधिवेशनास** व त्यानिमित्ताने प्रकाशित होणाऱ्या **स्मरणिकेस** माझ्या हार्दिक शुभेच्छा!

(सुरेश शेट्टी)

मंत्री
सामाजिक न्याय, विमुक्त, भटक्या जमाती
व इतर मागासवर्गीयांचे
कल्याण व व्यसनमुक्ती कार्य

महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : १३ जानेवारी, २०११

## शुभेच्छा

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे (फेस्कॉम) ३० वे अधिवेशन दि. ५ व ६ फेब्रुवारी, २०११ रोजी रामलीला मैदान, नेरुळ, नवी मुंबई येथे आयोजित केले आहे हे वाचून मला मनोमन आनंद वाटला.

वाढते शहरीकरण, कुटुंब व्यवस्थेचे झालेले विकेंद्रीकरण आणि माणसांचे वाढते आयुर्मान यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या वाढत असतांना वृद्धांचे जीवन आनंदी करण्यासाठी गेली ३० वर्षे कार्यरत असलेल्या फेस्कॉमला मनापासून धन्यवाद. फेस्कॉमचा सन २०१०-११ हे वर्ष पर्यावरण संरक्षण वर्ष म्हणून साजरे करण्याचा निर्णय हा सामाजिक बांधिलकी जपणार आहे. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे वाढते तापमान, वादळे, अतिवृष्टी व महापूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. हे सर्व टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संरक्षण हे आपले कर्तव्य मानले पाहिजे. फेस्कॉमच्या उपक्रमातून हा संदेश सर्वापर्यंत पोहोचावा असे मला वाटते.

फेस्कॉमच्या कार्याला व अधिवेशनास माझ्या हार्दिक शुभेच्छा !

(शिवाजीराव मोघे)